महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे/कालमर्यादा/ईमेलद्वारे**

क्रमांक. तंशिप्र१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/५०९ दि. ३१ मे, २०१९

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नोंदणी प्रक्रियेबाबत.**

संदर्भ :- १. तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/२५३ व २५५, दि.१९ मार्च, २०१९ रोजीची परिपत्रके.
२. तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/३४२ व ३४३, दि.१८ एप्रिल, २०१९ रोजीची परिपत्रके.
३. तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/४६७, दि.२२ मे, २०१९ रोजीचे परिपत्रक.
४. दि.२८/०५/२०१९ रोजी ईमेलद्वारे प्राप्त, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दि.२४/०४/२०१९ रोजीचे पत्र.

विषयांकित प्रकरणी राज्यातील खाजगी विनाअनुदानित/ शासकीय/ शासन अनुदानित/ महानगरपालिका/ अल्पसंख्यांक आरोग्य विज्ञान/तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/आयुष शिक्षण/कृषी शिक्षण/कला शिक्षण/पशू व मत्स्य विज्ञान शिक्षण या अभ्यासक्रमांच्या महाविदयालयांना/संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील पदव्युत्तर / पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया/प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेच्या प्रक्रियेसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safalta.org या ऑनलाईन पोर्टलवर संदर्भ क्र. ३ मधील परिपत्रकान्वये दि.३१/०५/२०१९ पर्यंत महाविद्यालयांची/अभ्यासक्रमांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक कागदपत्रे अपलोड/सादर करणे बंधनकारक होते. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांच्या संदर्भ क्र. ४ मधील पत्राच्या अनुषंगाने नोंदणी प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी शुक्रवार, दि.०७/०६/२०१९ रात्री ११.५९ मि. पर्यंत वाढ देण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये जे महाविद्यालय/संस्था प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास तसेच उक्त नमूद कागदपत्रे/माहिती सादर करण्यास असमर्थ ठरतील, अशा महाविद्यालयांचा/संस्थांचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रकियेमध्ये सहभाग करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या आदेशावरुन.

(आ. ए. रायते,) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्यांक व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/संस्था.

प्रत,
१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत वरीलप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता तथा उक्त निर्देश/परिपत्रक संचालकांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या विनंतीसह अग्रेषित,

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
४. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
६. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
३. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, रत्नागिरी
४. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.
५. गोंधवाना विद्यापीठ, गडचिरोली
६. कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर
७. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
८. पशू व मत्स्य विद्यापीठ, नागपूर
९. मुंबई विद्यापीठ, मुंबई.
१०. सोलापुर विद्यापीठ, सोलापुर.
११. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१२. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
१३. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर.
१४. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एसएनडीटी), मुंबई.
१५. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
१६. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.
१७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
१८. श्रीमती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
१९. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

प्रत,

१. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक.
२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक.
३. मे. कल्प टेक्नोलॉजीस, प्रा. लि. पुणे यांना सदर परिपत्रकाप्रमाणे प्राधिकरणाचे सफलता पोर्टल अद्ययावत करण्याच्या अनुषंगाने अग्रेषित.
४. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई